महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक नियंत्रण अधिसूचना/ ३४ /२०२४ दि. ०६/०३/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **ठाणेनगर** वाहतूक उपविभागाच्या हद्दीत दि. ०८/०३/२०२४ रोजी **'महाशिवरात्री'** निमित्त कोपीनेश्वर मंदिर, मुख्य बाजारपेठ, ठाणे या ठिकाणी सालाबादप्रमाणे यावर्षी देखील महाशिवरात्रौत्सव साजरा करण्यात येणार आहे. नमूद ठिकाणी मोठया प्रमाणात दर्शनासाठी भाविकांची गर्दी होत असते. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** जांभळी नाका येथून सुभाष पथ मार्गे मुख्य बाजारपेठ मधून ए–वन फर्निचर कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **जांभळी नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने जांभळी नाका येथून उजवे वळण घेवून टॉवर नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** जनता फॅशन येथून ए–वन फर्निचर मार्गे जांभळी नाका कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **ए–वन फर्निचर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने ए–वन फर्निचर येथून उजवे वळण घेवून दादोजी कोंडदेव स्टेडियम मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. ०८/०३/२०२४ रोजी सकाळी ०३.०० वा. ते रात्रौ २३.०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर अधिसूचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**प्रत माहितीसाठी**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
विभाग नियंत्रण, राज्य परिवहन, ठाणे.

CamScanner

नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.

**प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे**

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**

सहायक पोलीस आयुक्त, ठाणे वाहतूक विभाग, पो.नि. ठाणेनगर वाहतूक उपविभाग.